# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड

## (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प )

---

## विजया दशमी, धम्म चक्र प्रवर्तन दिनानिमित्त मेट्रो सेवेत वाढ

### उद्या (१२ ऑक्टोबर) रात्री १२ वाजेपर्यंत मेट्रो सेवा उपलब्ध



नागपूर ११: विजया दशमी, धम्म चक्र प्रवर्तन दिनानिमित्त नागपुरात मोठ्या प्रमाणात होणारी वाहतूक बघता, मेट्रो सेवेट वाढ केली असून उद्या (१२ ऑक्टोबर) रात्री १२ वाजेपर्यंत मेट्रो सेवा उपलब्ध असेल. शेवटची मेट्रो ट्रेन ही रात्री १२ वाजता चारही मेट्रो टर्मिनल स्टेशन (खापरी, ऑटोमोटिव्ह चौक, लोकमान्य नगर आणि प्रजापती नगर स्टेशन) येथून सुटेल याची नागरिकांनी नोंद घ्यावी.



या दोन उत्सवाच्या निमित्ताने शहरात मोठ्या प्रमाणात गर्दी असते. नागपूरच्या विविध भागातूनही या दिवशी लाखो अनुयायी दीक्षाभूमीवर येत असतात. तसेच विजया दशमीच्या निमित्ताने रावण दहन असेल किंवा दसऱ्याला भेटीगाठी, शहरभर नागरिकांची रेलचेल चालू असते. विधान भवन चौक, नागलोक (कामठी रोड), ड्रॅगन पॅलेस (कामठी) येथे भाविकांची मोठी गर्दी असते. या सगळ्याचा विचार करून मेट्रो सेवेच्या वेळेत वाढ झाल्याचा फायदा या प्रवाशांना होणार आहे. त्यामळे रस्त्यावरिल वाहतूक कोंडीपासून वाचण्यासाठी जास्तीत जास्त नागरिकांनी मेट्रो प्रवासाचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

सार्वजनिक वाहतुकीत नागरिकांच्या पसंतीस उतरलेली वाहतूक सेवा म्हणजे नागपूर मेट्रो रेल सेवा. मेट्रो हे वाहतुकीचे सर्वोत्तम, सुलभ, सुविधाजनक, किफायतशीर आणि सुरक्षित साधन आहे. नोकरीपेशा लोकांसाठी, व्यावसायिकांसाठी आणि विशेषतः विद्यार्थ्यांसाठी मेट्रो अत्यंत उपयुक्त ठरत आहे.